# घरफोडीच्या आरोपीला २४ तासाच्या आत एम.आय.डि.सी.बोरी पोलीसांनी केले गजाआड ३,३५,०००/-रु चा मुददेमाल हस्तगत केले.



पोलीस स्टेशन एम.आय.डि.सी.बोरी हददीतील मौजा वटेघाट येथे राहणारे नामे किशोर टिकमचंद संचेती, वय ३१ वर्ष हे दि.२७/०९/२०१९ रोजी नवरात्र निमित्याने देवीचे घट बसविण्याकरीता आपल्या पत्नी व आई वडीलासह मौजा टाकळघाट येथे आपल्या घराला कुलूप लावुन गेले आणि देवीचे दर्शन घेवुन आपल्या परिवारासह दि.०६/१०/२०१९ रोजी संध्याकाळी २०.३० वा आपल्या घरीआले. तेव्हा घराचा पुढील दारवाज्याच्या कुलूप खोलुन आत प्रवेश केला. तेव्हा घरातील आलमारीचे दार उघडे दिसले. आलामारीतील सामान व सोन्या चांदीचे दागीने डब्या खाली पडून दिसले. घरातील सामान अस्ताव्यस्त अवस्थेत पाहुन त्यांच्या पाया खालची जमीन सरकली. किशोर संचितीने नवीन घर खरेदी करीता जमा केलेले ३,००,०००/-रु व १० ग्रॅम वजनाचे सोन्याची गोफ त्यांना त्याठिकाणी दिसुन आली नाही. त्यामुळे त्यांच्या घरात कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याचे समजुन गेले व तात्काळ पोलीस स्टेशन एम.आय.डि.सी. बोरी येथे जावुन तक्रार नोंदविल्यावरुन पोलीस स्टेशन एम.आय.डि.सी.बोरी येथे अपराध क्रमाक ३४०/२०१९ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि

अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर घटनेची माहिती मा.श्री.राकेश ओला सा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण व श्रीमती मोनिका राऊत अपर पोलीस अधिक्षक मॅडम नागपूर ग्रामीण यांना दिले त्यांच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे पोलीस निरीक्षक विनोद ठाकरे यांनी तपासाची सुत्रे आपल्या हाती घेतले.

पोलीस निरीक्षक विनोद ठाकरे यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन क्षणाचाहि विलंब न लावता तात्काळ आपल्या पथकासह घटनास्थळी भेट देवुन घटना स्थळाची बारकाईने पाहणी केली. तेव्हा गुन्हेगाराचे घटनास्थळी प्रवेशाचे इतर कोणतेही ठिकाण दिसुन आले नाही.दरवाज्याच्या कुलूपावर एका बाजुने दगडाने मारुन चपकवुन दिसले. तेव्हा पोलीसांनी फिर्यादी किशोरयांच्या कडून चाबी घेवुन लावुन पाहीले असता कुलूपचा गंले कामकरीत असल्याचे निदर्शनास आले. तेव्हा पोलीस निरीक्षक विनोद ठाकरे हे समजुन गेले कि, सदर कुलूप हे चाबीने काढण्यात आले आहे व चोरी झाल्याचा देखावा करण्यासाठी कुलूपावर दगड मारुन चपकविण्यात आले हे पाहताच पो.नि.विनोद ठाकरे यांनी फिर्यादी व शेजारी यांना कसुन विचारपुस केले. तेव्हा त्यांना समजले कि, फिर्यादी किशोर संचेती यांचे दुरचेनातेवाईक नामे राकेश रामलाल सिंग वय २४ वर्ष, रा. ताडाळीता, जि. चंद्रपूर हा सुध्दा एम. आय.डि.सी येथे कामकरीत असल्याने तो सुध्दा त्याच गावात राहत होता. त्याच्याकडे फिर्यादी किशोर संचेतीच्या घराची एक चाबी होती. व फिर्यादी किशोरच्या घरी रामलाल सिंग याचे येणे-जाणे होते. हे समजल्यावर पोलीस निरीक्षक विनोद ठाकरे यांनी रामलाल सिंग याची गोपनीय माहिति घेतली.तेव्हा मागील दोन दिवसा पासुन तो गावात नसुन चंद्रपूर येथे गेल्याचे समजले. तेव्हा तात्काळ गुन्हे प्रकटी करणाचे एक पथक पोलीस हवालदार शैलेद्र नागरे यांचे तयार करुन त्यात पोहवा किशोर डेकाटे, पोलीस नाईक इकबाल शेख, प्रफुल राठोड यांना खाजगी वाहनाने दि.७/१०/२०१९ चे रात्रो ०१.०० वा



चंद्रपूर करीता पाठविले. सदर पथकाने चंद्रपूर येथे मौजा ताडाळी येथे रामलाल सिंगचा शोध घेतला परंतु तो आपल्या घरी मिळून आला नाही. सापळा रचुन त्याच्या चद्रंपूर हायेवर असलेल्या हॉटेल मध्ये शोध घेतला असता त्याठिकाणी रामलाल सिंग पोलीसांच्या हाती लागला. त्याला पोलीस पथकाने घटनेच्या अनुषंगाने विचारपुस केले असता तो पोलीसांना उडवा उडवीचे उत्तर देत असल्याने त्याच्यावर असलेला संशय पोलीसांना बळावल्याने त्यास ताब्यात घेवुन पोलीसांनी अटक करुन पोलीस कस्टडी रिमांड घेवुन त्यास विचारपुस केले असता त्याने गुन्हयाची कबुली देत सांगीतले कि, त्याच्यावर मित्रांचे भरपुर कर्ज होते व किशारे संचेती यांनी नवीन घर खरेदी करीता घरी पैसे आणुन ठेवल्याचे त्यास माहिती होते.त्यामुळे त्याने दि ०३/१०/२०१९ रोजी त्याच्याकडे किशोर संचेतीच्या घराची चाबी असल्याने त्याने दार उघडून आलमारीतील ३ लाख रुपये व १० ग्रॅम वजनाची सोन्याची गोफ चोरी केले व त्याच्यावर संशय येवु नय म्हणुन त्याने घरातील सामान अस्ताव्यस्त केले. सदर चोरी केल्या नंतर गावाकडे निघुन गेला. त्यांच्या घरा शेजारचे पडीत शेतात पैसे व सोन्याची गोफ लपविल्याचे सांगीतल्याने पोलीसांनी तो मुददेमाल पंचा समक्ष जप्त केला.




सदर गुन्हयाचा तपास मा.राकेश ओला साहेब, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा.श्रीमती मोनिका राऊत अपर पोलीस अधिक्षक मॅडम व मा.राजेद्र चव्हाण साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर उप विभाग यांच्या मार्गदर्शनात व पोलीस निरीक्षक विनोद ठाकरे पो.स्टे एम.आय.डी.सी.बोरी यांच्या नेतृत्वात पोहवा शैलेद्र नागरे, किशोर डेकाटे, पोलीस नायक इकबाल शेख, प्रफुल राठोड यांनी आपले बौध्दीक कौशल्य व तत्परतेने तपास करुन अवघ्या २४ तासाच्या आत गुन्हा उघडकीस आणुन आरोपी रामलाल सिंग यास अटक करुन त्याच्या कडून चोरीस गेलेले ३,३५,०००/-रु चा मुददेमाल हस्तगत करण्यात यश मिळविले.



**तपासी अधिकारी**
पो.नि.श्री. विनोद ठाकरे,
ठाणेदार, पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. बोरी,